| MHKO190003372025 | **निशाणी क्र.१७ खालील आदेश**<br>**नियमित दिवाणी दावा क्र.१००/२०२५**<br>***बाजीराव मारुती मोरे वि. पांडूरंग शिवाजी पोवार व इतर***<br>**(दिनांकः०९/०४/२०२६)** |
|---|---|

प्रतिवादी नं.२ सरवडे व्यापारी असोसिएशन को–ऑप, क्रेडिट सोसा. मर्या. सरवडे यांचेतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार प्रस्तुतचा दावा चालणेस पात्र नसलेने फेटाणेत यावा याकरीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी नं.२ चे कथन असे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापन व आज्ञार्थी हुकूम होणे करीता दाखल केलेला आहे. परंतु प्रतिवादी नं.२ ही सहकार कायद्याअंतर्गत स्थापण झालेली क्रेडिट सोसायटी असुन त्यांचे वाद सोडविण्याकरीता सदर कायद्याअंतर्गत स्वतंत्र न्यायालयाची स्थापणा करण्यात आलेली आहे. वादी व प्रतिवादी नं.१ हे प्रतिवादी नं.२ चे 'अ' वर्ग सभासद असुन त्यांच्यामधील वाद दिवाणी न्याय संहितेच्या अंतर्गत येत नसुन सहकार कायद्याअंतर्गत येतो. त्यामुळे प्रतिवादी नं.२ ने प्रस्तुतचा दावा या न्यायालयामध्ये चालणेस पात्र नसलेने तो फेटाळणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादी तर्फे नि.क्र.१९ कडे त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जातील कथने नाकारली आहेत. वादीचे कथन असे की, प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापन व आज्ञार्थी हुकूम होणेकरीता दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामी प्रतिवादी नं.१ व २ यांनी त्यांच्या अधिकारक्षेत्रा बाहेर केलेल्या कृत्याबाबत दाद मागणी केलेली आहे. यातील प्रतिवादी नं.१ ने वादी यांची फसवणुक करुन त्यांचे मालकीचे सोन्याचे ब्रेसलेट प्रतिवादी

नं.२ संस्थेकडे तारण गहाण ठेवले आहे. सदरची बाब टचिंग द बिझनेस ऑफ द सोसायटी या सदराखाली येत नाही. प्रतिवादी नं.२ यांनी सहकार कायद्यातील तरतुदींचा चुकीचा अर्थ लावुन सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा दावा या न्यायालयामध्ये चालणेस पात्र आहे. शेवटी वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखावर उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले असता माझ्यासमोर खालील प्रमाणे विचाराधीन प्रश्न निर्माण झाले आहेत व त्यावरील निष्कर्श मी खालील नमुद कारणमिमांसेसह देत आहे.

| **अ.क्र.** | **विचाराधीन प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीचा दावा फेटाळणेस पात्र आहे काय? | नकारार्थी |
| २. | काय आदेश? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## –कारणमिमांसा–

**विचाराधीन प्रश्न क्र.१ बाबतः–**

६. प्रस्तुतचा अर्ज व अभिलेखावरील उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीं विरुध्द हक्कज्ञापन व आज्ञार्थी हुकूम होवुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी नं.१ ने त्याची फसवणुक करुन त्याच्या मालकीचे सोन्याचे ब्रेसलेट प्रतिवादी नं.२ संस्थेकडे तारण गहाण ठेवले आहे. प्रतिवादी यांच्या सदर कृतीस असनुसरुन वादी

त्यांच्या विरुध्द हक्कज्ञापन व आज्ञार्थी हुकूमाची मागणी करतो आहे.

७. वादीची अर्जातील कथने व प्रतिवादींच्या सदर कृतीच्या अनुषंगाणे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० चे कलम १६३ चा या ठिकाणी उल्लेख करणे गरजेचे आहे.

**१६३.** १) या अधिनियमात स्पष्टपणे तरतूद केली असेल त्याखेरीज, कोणत्याही दिवाणी किंवा महसूल न्यायालयास पुढील बाबतीत कोणतीही अधिकारिता असणार नाही –

क. संस्थेची किंवा तिच्या उपविधीची नोंदणी किंवा तिच्या उपविधींची सुधारणा किंवा संस्थेच्या समितीचे विसर्जन किंवा संस्थेचे विसर्जन झाल्यानंतर तिचे व्यवस्थापन, किंवा

ख. (सहकारी न्यायालयाकडे) निर्णयासाठी निर्देशित करणे आवश्यक असलेला कोणताही विवाद, किंवा

ग. संस्थेचे समापनाशी व तिच्या विसर्जनाशी संबंधित कोणतीही बाब.

२) संस्थेचे समापन होत असताना, निबंधकाच्या परवानगीशिवाय आणि तो लादील अशा अटींना अधीन राहून, संस्था किंवा तिचा कोणताही सदस्य यांच्या विरुध्द किंवा संस्थेच्या कामकाजाशी संबंध असलेल्या कोणत्याही गोष्टीबाबत कोणताही वाद किंवा इतर कायदेशीर कार्यवाही पुढे चालविता येणार नाही किंवा दाखल करुन घेतली जाणार नाही.

३) हा अधिनियम किंवा नियम यानुसार देण्यात आलेले सर्व आदेश, निर्णय किंवा निवाडे हे या अधिनियमातील अपील किंवा पुनरीक्षण याविषयीच्या तरतुदींना अधीन राहून अंतिम असतील आणि गुणावगुणांवरुन किंवा कोणत्याही इतर कारणावरुन असो कोणताही आदेश, निर्णय किंवा निवाडा, त्यावर, कोणत्याही न्यायालयात हरकत घ्यावयास ती रद्द करावयास, त्यात फेरबदल करावयास, त्याची फेरतपासणी करावयास किंवा तो निरर्थक ठरविला जाण्यास पात्र असणार नाही.

८. सहकारी संस्था अधिनियमातील उपरोक्त तरतुदीं विचारात घेता असे दिसुन येते की, वादीने दाखल केलेला दावा हा प्रतिवादी नं.२ संस्थेच्या व्यावसाईक कामकाजाशी संबंधीत नाही.

९. कायद्याच्या प्रस्थापीत तत्वानुसार आदेश ७ नियम ११ नुसार दाखल करण्यात आलेल्या अर्जाच्या अनुषंगाणे निष्कर्ष नोंदविण्याकरीता केवळ दाव्यातील कथनेच विचारात घ्यावी लागतात. वादीच्या दाव्यातील कथनांनुसार प्रतिवादी नं.१ ने वादीच्या मालकीचे सोन्याचे ब्रेसलेट प्रतिवादी नं.२ कडे तारण गहाण ठेवुन कर्ज उचल केलेली आहे. त्याबाबत वादीने प्रतिवादी नं.२ संस्थेकडे तक्रार अर्ज दाखल करुन प्रतिवादी नं.१ वर कायदेशीर कारवाई करण्याची विनंती केली होती. परंतु प्रतिवादी नं.२ ने प्रतिवादी नं.१ विरुध्द कोणतीही कायदेशीर कारवाई केलेली नाही. प्रतिवादींची सदरची कृती ह प्रतिवादी नं.२ च्या व्यवसायाशी निगडीत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दावा चालविणेचा या न्यायालयास अधिकार प्राप्त होतो. त्यामुळे मी विचाराधीन प्रश्न क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**विचाराधीन प्रश्न क्र.२ बाबतः–**

१०. उपरोक्त चर्चा व विचाराधी प्रश्न क्र.१ चा निष्कर्ष विचारात घेवुन विचाराधीन प्रश्न क्र.२ करीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आदेश –**

प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.१७ नामंजुर करण्यात येतो.

RAJENDRA DHANAJI SHINDE Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE Date: 2026.04.09 17:27:55 +0530

**(आर.डि.शिंदे)**

दिनांकः०९/०४/२०२६ दिवाणी न्यायाधीश क. स्तर,राधानगरी.